मंत्रालयीन विभाग व त्यांच्या आधिपत्याखालील कार्यालयांमध्ये ई-ऑफिसप्रणालीच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण - २०२३/प्र.क्र.०२/१८(र. व का.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०२ फेब्रुवारी, २०२३.

वाचा :- सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान उपविभाग) यांचे शासन परिपत्रक क्रमांक : मातंसं- २०१२/ प्र.क्र.२५३/का.३९, दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२०.

प रि प त्र क

राज्य शासनाच्या शासकीय कामकाजात संगणकाचा अधिकाधिक वापर करून शासकीय कामकाज गतिमान व्हावे, कामकाजात सुसूत्रता यावी, दस्तऐवज व माहिती सुरक्षित, त्वरेने व जलद गतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी मंत्रालयीन विभागांमधील शासकीय कामकाजात ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करून सदर प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक असलेल्या कार्यपद्धती (SOP) संदर्भात उपरोक्त "वाचा" येथील दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२० च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

२. मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांमधील तसेच क्षेत्रीय कार्यालयांतील शासकीय कामकाजात दिनांक ०१ एप्रिल, २०२३ पासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर प्रभावीपणे करावयाचा आहे. मंत्रालयीन विभाग व त्यांच्या आधिपत्याखालील कार्यालयांमध्ये प्राप्त होणा-या टपालांवर तात्काळ कार्यवाही व्हावी व वेळेचा अपव्यय होऊ नये याकरिता १ फेब्रुवारी, २०२३ पासून मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांत तसेच क्षेत्रीय कार्यालयांतील पत्रव्यवहार करतांना प्रत्येक टपाल ई-ऑफिस माध्यमातून पाठविण्याबाबतची कार्यवाही काटेकोरपणे करण्याबाबतच्या सूचना देण्यात येत आहेत.

३. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांमार्फत पाठविण्यात येणारे जे टपाल (उदा.नकाशे, पुस्तके इ.) ई-ऑफिस माध्यमातून पाठविणे शक्य होणार नाही, केवळ असेच टपाल हस्तबटवडयाने पाठविण्यात यावे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना हस्तबटवडयाने प्राप्त होणारे टपाल स्वीकारण्यासाठी मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराच्या ठिकाणी व्यवस्था करण्यात येत आहे. सदरच्या ठिकाणी हस्तबटवडयाने प्राप्त होणारे टपाल कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत स्वीकारण्यात येईल.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२३०२०२१४२८२२५६०७ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJATA MANOJ SAUNIK

Digitally signed by SUJATA MANOJ SAUNIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=04f6ff0d1ef52294e1935fcfac66e30d146fa47249c32a356455a756d05ec1a9, pseudonym=8F4351E52AE8704CVE34CC2EF2A8B14A7151D70, serialNumber=F4917320CDAJF705F41A6977F5A6C3DFD1AF621CD434ABBB16956501ABD4A1F, cn=SUJATA MANOJ SAUNIK
Date: 2023.02.02 14:33:01 +05'30'

(सुजाता सौनिक)
अपर मुख्य सचिव

प्रत-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२. सचिव, राज्य निवडणूक आयोग, पहिला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ०३२.
१३. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१५. प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
१६. प्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
१७. प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, १ ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-४०० ०३२.
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक ऑफ इंडिया इमारत, मुंबई-४०० ०२३.
१९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.
२०. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
२१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२३. सर्व विभागीय आयुक्त.
२४. सर्व जिल्हाधिकारी.
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२६. मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.